महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१

क्र. मासं/रवका/न.क्र.३४८/ ६७२३
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड,माटुंगा,
मुंबई ४०० ०१९
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
दिनांक : २२/०३/२०२१

# शुध्दीपत्रक

**विषय - सर्व शासकीय कार्यालयांमध्ये काम करणाऱ्या नियमित तसेच कंत्राटी स्वरुपातील अधिकारी कर्मचारी / सल्लागार यांच्यासाठी कार्यालयात परिधान करावयाच्या पोशाखा संदर्भात (ड्रेस कोड) मार्गदर्शक सूचना.**

**संदर्भ -** म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रशासकीय परिपत्रक क्र ६१४ दिनांक. ३१.१२.२०२०

महाराष्ट्र शासनाचे परिपत्रक क्र. संकीर्ण - २०२०/प्र.क्र. ७१/१८ (र.व.का.) दिनांक ०८ डिसेंबर, २०२० अन्वये सर्व शासकीय कार्यालयांमध्ये काम करणाऱ्या नियमित तसेच कंत्राटी स्वरुपातील अधिकारी कर्मचारी / सल्लागार यांच्यासाठी कार्यालयात परिधान करावयाच्या पोशाखा संदर्भात (ड्रेस कोड) मार्गदर्शक सूचना पारीत करण्यात आल्या आहेत. सदरच्या सूचना प्रशासकीय परिपत्रक क्र. ६१४ दि. ३१.१२.२०२० अन्वये कंपनीअंतर्गत अंगिकृत करण्यात आल्या आहेत.

२. आता, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग यांचे शासन शुध्दीपत्रक क्र. संकीर्ण/२०२०/प्र.क्र.७१/१८ (र.व.का.) दिनांक १६ मार्च, २०२१ अन्वये पोशाखाबाबतच्या सूचनांमध्ये अंशत: बदल करण्यात आला असून त्या अनुषंगाने प्रशासकीय परिपत्रक क्र. ६१४ दि. ३१.१२.२०२० मधील परिच्छेद क्र. २ अंतर्गत अनुक्रमांक "ख" मध्ये खालीलप्रमाणे अंशत: बदल करण्यात येत आहे.

**"तसेच सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी जीन्स व टी-शर्ट चा वापर कार्यालयामध्ये करु नये"** या वाक्याऐवजी **"तसेच सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी टी-शर्टचा वापर कार्यालयामध्ये करू नये."** असे वाचण्यात यावे.

३. सदर शुध्दीपत्रक कंपनीच्या e-Library वर उपलब्ध करण्यात आले आहे.

**सोबत** : शासन शुध्दीपत्रक दि. १६.०३.२०२१

**(कमांडर शिवाजी इंदलकर) (से.नि.)**
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**